


## गोष्ट क्र.२५

माझ्यापेक्षा ज्या व्यक्ती जास्त यशस्वी आहेत त्यांच्याकडून मी कायम प्रेरणा घेत आलो आहे. अनेक कठीण प्रसंगांना मी शांतपणे आणि स्थिरबुद्धीने सामोरा गेलो. I am a doer. प्रत्यक्ष कृती करणे मला जास्त आवडते. लोकांनी तुम्हाला नेता म्हणून स्वीकारले पाहिजे. गांधीजींचे महत्त्व काय? कोणालाच त्यांच्यासारखे शेकडो–हजारो अनुयायी मिळवता आले नाहीत. अगदी त्यांच्या आयुष्यात, किंवा मृत्यूनंतर ही नाही! Innovation आणि leadership वेगळ्या गोष्टी आहेत. प्रबोधिनीने सर्वांना आपलेसे केले पाहिजे. कोणीतरी यावर विचार केला पाहिजे, 'हा बिघडला' असे का म्हणायचे? व्यक्ती जशी आहे तशी स्वीकारली पाहिजे. We could have done better असे म्हणणे नेहमीच उपयुक्त असते. मी काही भन्नाट पराक्रम केला अशा भ्रामक समजुतीत मी नाही! लोकांनी म्हणायला पाहिजे की त्याने पराक्रम केला आहे!

अभय खेर
(१९६९–१९७३)

**आठवणी**

माझा जन्म आणि आजोळही पुण्यातले, माझे वडील आणि आजोळी मामा-मामी व मावशी हेही शिक्षण क्षेत्रातच होते. आमच्या घरी प्रचंड पुस्तके असायची. त्यामुळे मी ही लहानपणापासूनच भरपूर वाचन करायचो. पहिली ते सहावी वडीलांच्या नोकरीमुळे, धुळ्यासारख्या कमी प्रगत गावात सरकारी शाळेत शिकलो. सरकारी शाळा असून उत्तम शिक्षक होते. परन्तु मी वडिलांकडे सतत पुण्याला नूमवित शिकायला जाण्याचा भुंगा लावायचो. १९६९साली मी सहावीची परीक्षा दिली आणि नेहमीप्रमाणे उन्हाळ्यात पुण्यात आलो असतांना वडीलांनी सांगितले, तुला पुण्यात शिकायला ठेवतो, जर या शाळेत प्रवेश मिळवू शकलास तर!

मला अजूनही न्यू इंग्लिश स्कूलचा वर्ग आठवतो जिथे प्रवेश परीक्षा दिली. अर्थात बरीच कमी हुशार मुले परीक्षेला बसल्यानेच मला प्रवेश मिळाला याबद्दल मला शंका नाही.

सर्व शिक्षक-शिक्षिका त्यांच्या विषयात तज्ज्ञ होतेच पण प्रतिभावान व प्रगत विचारांचे होते. त्यातले काही फार अल्पकाळच होते परन्तु प्रभाव दूरगामी होता/आहे. सांगण्यासारख्या अनेक गोष्टी आहेत पण एक-दोनच सांगतो.

प्रबोधिनीत त्यावेळेस शाळेची आस्थापना फारशी नव्हती, इमारत नव्हती पण शिक्षक खूपच वेगळे होते. हिंदीला आम्हाला डॉ. दुर्गाताई दीक्षित होत्या, त्या पुढे पुणे विद्यापीठात हिन्दी विभागाच्या प्रमुख झाल्या. उत्तम शिक्षक लाभणे हे आमचे भाग्यच होते. अनेक शिक्षक त्यांच्या विचारातही अत्यंत प्रगत होते.

इंग्रजी शिकवायला श्रीमती सावरकर बाई होत्या ज्यांनी माझ्या आईला पण अहिल्यादेवीत असताना शिकवले होते. त्यांची एक आठवण आई कायम सांगायची. एका वर्षी शैक्षणिक कामगिरी वाईट असूनही सर्वोत्तम विद्यार्थिनी पारितोषिक आईला मिळाले होते. काही मुलींनी याचे कारण विचारले असता, त्यांनी समारंभात Prize is for her helping nature, best human being असे उत्तर दिले. ही आठवण मी सावरकर बाईंना सांगितल्यावर त्यांच्या चेहऱ्यावरील सार्थकतेचा भाव अजूनही मनावर कोरला आहे.

मा. वामनरावांनी Trigonometry आणि संस्कृतच्या पहिल्याच तासाला या कुन्देदु तुषारहारधवला शिकवलेले लक्षात आहे ! आत्ताच्या शेती कायद्यात जिल्हा बंदी उठवली आहे त्या बंदीचे वीस तोटे आनंद हर्डीकर सरांनी १९७१/७२ सालीच सांगितल्याचे अजूनही आठवते.

खरंतर मी प्रत्येक शिक्षकांच्या अनेक आठवणी सांगू शकतो. अशोकराव निरफराके, विनयराव हर्डीकर, रामभाऊ डिंबळे, शरद सुंकर, सुभाषराव देशपांडे, शिवराज गोर्ले (गमतीने सदाशिव पेठेतील पु. ल. म्हणायचो). रामभाऊ डिंबळे यांच्यासारखे उच्चार मी आजपर्यंत कधीच ऐकले नाहीत! विसूभाऊ गुर्जर हे आमचे जीवन शिक्षक ! तेव्हा ते पण शिकत होते आणि काही कालांतराने शिकवायला पण आले ! त्यांच्याकडून एक गोष्ट शिकलो आणि त्याचा अजूनही उपयोग होतो ती म्हणजे, कोणतीही गोष्ट अशक्य नाही अर्थात तसे प्रयत्न हवेत. त्यांच्याकडून एखादी गोष्ट अवघड, अशक्य आहे असे ऐकले नाही.

आमच्या वेळी विद्यार्थी संख्येने खूपच कमी परन्तु प्रतिभावान! आठवणी तर अनेक आहेत ! पण याच का विचारू नका ! सुहास गोळेचे लहान व फिक्कट शाईत जाड नीबाने सुंदर हस्ताक्षरातील दहा-पंधरा पाने निबंध/ रसग्रहण, शि. म. (?) परांजपे (१ली तुकडी) व विनयरावांचे वेल्हे-रायगड ट्रेकमधील कविता गायन, मोहन गुजराथीच्या कब्बडीतील धडका, केदार भाटेचा १०० मी. फ्री स्टाईल मधील पहिला नंबर, संजय गोखलेचे वक्तृत्व इ. इ. डोळयासमोरून चलचित्रपटा सारख्या सरकत जातात ! माझ्या नंतरच्या तुकड्यांतील अनेक मित्र आहेत. I was in the company of best friends.

मी उपासना, मुंज, हिंदुत्व, कर्मकांडे यात रंगलो नाही, मला पटली नाहीत आणि हे सर्वांना अगदी आप्पांनासुध्दा, माहिती असूनही आकस, दुर्लक्ष या गोष्टींना कधी सामोरे जावे लागले नाही. ती. आप्पांना मी एकटा असा फक्त दोनदाच भेटलो आहे. इयत्ता आठवत नाही पण नववी-दहावी असावी. पहिल्यांदा बोलवून सांगितले की वडिलांना भेटायला सांग. अर्थात कारणांची थोडीफार कल्पना होतीच तरी वडीलांना सांगितले. ते बरं म्हणाले पण भेटले नाहीत. नंतर साधारण महिन्याने परत बोलवून विचारले तेव्हा मी वडिलांना निरोप दिल्याचे सांगितले. त्यावर ते थोडे विचारमग्न होत एकदम म्हणाले, 'आपल्याला आमचे विचार पटत नसतील तर शाळा सोडून जाऊ शकता!' प्रत्यक्षात तसे केले नाही पण त्यानंतर तो विषय निघाला नाही. हा प्रसंग सांगणे संयुक्तिक आहे की नाही माहित नाही पण माझ्या मते महत्त्वाचे नक्की आहे.

माझे वडील प्राचार्य होते. आई द्विपदवीधर आहे, मामा-मामी, मावशी आणि इतर नातेवाईक उच्चशिक्षित आहेत. त्यामुळे आमच्या घरी मी उत्तम शैक्षणिक वातावरणातच वाढलो. I am always in dilemma to give full credit to Prabodhini. It is 50-50. 'रूप पालटू देशाचे' हे आप्पांचे स्वप्न होते पण मला वाटायचे "I'm too small person to live that dream.' !

**महाविद्यालयीन शिक्षण**

१९७४साली ११वी झालो. त्याकाळी थोडेफार चांगले समजल्या जाणाऱ्या गुणांनी उत्तीर्ण झाल्यावर फर्ग्युसनमध्ये सहज प्रवेश मिळत असूनही एक वर्षासाठी धुळ्याला परतलो. आणि नंतर IIT Entrance ला नंबर येऊनसुध्दा COEP ( Govt College of Engg., Pune ) मध्ये प्रवेश घेतला. मला स्वतःला विशेष वाटत नसले तरी सर्व सामान्यांना याचे अप्रूप वाटते. राजीव बसर्गेकरने पण तसे केले होतेच की.

मला वाटते हे करण्याची मानसिक ताकद शाळेने दिली. स्वतःला वाटते ते बेदरकारपणे करणे आणि प्रयत्नांनी त्यात यश मिळवणे ही शाळेची देन आहे. नंतर पुढे IMDR चा तीन वर्षांचा व्यवस्थापनाचा कोर्स व त्यातील finance विषयात specialization केले.

या काळात मी जरी प्रबोधिनीत जात नसलो तरी तिकडे काय चालले आहे हे अनेकांकडून कळत असे. त्या काळात ज्यांचे अगदी छोट्या गोष्टीत प्रबोधिनीशी जुळत नव्हते त्यांना दूर ठेवले गेले. अर्थात आता सर्वसमावेशकता खूपच वाढली आहे आणि ते चांगले आहे.

**उद्योग व्यवस्थापनातील वाटचाल**

मी Trainee Engineer पासून कामाला सुरुवात केली आणि ती सुध्दा उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेश सीमेवरील मिर्झापुर तालुक्यातील Super Thermal Power plant construction पासून. सगळंच टोकाचं (extremes), हवामान, रहाणे, जेवण, लोक, काम ... आणि पुण्यातल्याला त्याहून जास्त त्रासदायक.

माझा Westen India Erector Ltd (2.5 years ), Thermax / Thermax Babcock Wilcox (26 years-Head - Project Management - 1600 Cr ) ThyssenKrupp Industries India (3years-Vice President) ISGEC Heavy Engg Ltd (4years-SrVice President - EPC projects - 1000 Cr) असा २०१६ पर्यंतचा प्रवास आहे.

माझी पहिली सात-आठ वर्षं भारतातील वेगवेगळ्या Project sites वर गेली. त्यातून भारताच्या Unity in Diversity चा परिचय झाला. त्याच वेळी अनेक चुकीच्या समजुती, पूर्वग्रह व भारत बदलण्यात लागणाऱ्या कष्टांची जाणीव झाली. What one learns at site, can never learn reading thousand of books on Management, Human Behaviour and Diversity of India .

माझा अनुभव आणि धारणा अशी आहे की मराठी Engineer / माणसांच्या Business ideas Technical skill are of highest level पण अर्थिक व ग्राहक व्यवहाराच्या बाबतीत कमी पडल्याने उद्योगात मागे पडतात. मी म्हणून नोकरी करत IMDR चा तीन वर्षांचा (Part time) व्यवस्थापनाचा Finance specialization घेऊन कोर्स केला.

**माझा नोकरीतील प्रवास उलटा सुरू झाला. Construction is where final product is built. मी नंतर Purchase, Manufacturing साधारण दहा वर्षांनी Project Management मध्ये शिरलो. मला इतर Dept मध्ये काम करण्याचा खूपच फायदा झाला. अनुभव चौफेर मिळाला जो पुढील प्रगतीस पूरक ठरला. या सर्व कालावधीत अत्यंत गरीब मजूर, विस्थापित, अति श्रीमंत व प्रामाणिक त्याच प्रमाणे willfull defaulters व्यावसायिक, राजकारणी, सरकारी अधिकारी, नक्षलवादी खूप जवळून पाहिले, अनुभवले आहेत. गुंतागुंतीचे व्यवहार, राजकीय दबाव, नक्षलवाद्यांचा हस्तक्षेप अशा सर्व बाजू सांभाळून प्रकल्प पूर्ण केले आहेत. ही कसरत वाटते तेवढी सोपी नाही पण ती करण्याची ताकद प्रबोधिनीतील संस्कार देतात, मला दिले/देत आहेत. काम कितीही अवघड असले तरी अशक्य नाही ही प्रबोधिनीतील शिकवण नेहमीच कामास आली.**

माझ्या मते नोकरीत आणि विशेषतः जबाबदारीच्या जागी तर्कटापेक्षा तारतम्यभाव फार जास्त महत्त्वाचा आहे. माझ्यापेक्षा ज्या व्यक्ती जास्त यशस्वी आहेत त्यांच्याकडून मी कायम प्रेरणा घेत आलो आहे. अनेक कठीण प्रसंगांना मी शांतपणे आणि स्थिरबुद्धीने सामोरा गेलो. I am a doer. प्रत्यक्ष कृती करणे मला जास्त आवडते. लोकांनी तुम्हाला नेता म्हणून स्वीकारले पाहिजे. गांधीजींचे महत्त्व काय? कोणालाच त्यांच्यासारखे शेकडो-हजारो अनुयायी मिळवता आले नाहीत. अगदी त्यांच्या आयुष्यात, किंवा मृत्यूनंतर ही नाही! Innovation आणि leadership वेगळ्या गोष्टी आहेत. प्रबोधिनीने सर्वांना आपलेसे केले पाहिजे. कोणीतरी यावर विचार केला पाहिजे, 'हा बिघडला' असे का म्हणायचे? व्यक्ती जशी आहे तशी स्वीकारली पाहिजे. We could have done better असे म्हणणे नेहमीच उपयुक्त असते. मी काही भन्नाट पराक्रम केला अशा भ्रामक समजुतीत मी नाही! लोकांनी म्हणायला पाहिजे की त्याने पराक्रम केला आहे!

थरमॅक्समध्ये Human Resourses / Developement ला फार महत्त्व आहे. वर्षात अनेक Training courses असतात आणि आवड व गरज दोन्ही पाहून कर्मचारी attend करू शकता. सगळ्यात पहिला केलेला training programme हा Time Management चा होता. त्यामध्ये तुम्ही तणावरहित असणे हे कसे महत्त्वाचे आहे आणि महत्त्वाच्या आणि तातडीच्या निर्णयांसाठी ध्यानधारणा कशी महत्त्वाची आहे हे शिकवताना सगळ्यात शेवटी गायत्री मंत्र शिकवला आणि तेव्हा हे जाणवले की प्रबोधिनी याचे जास्त चांगले प्रशिक्षण देते. जेव्हा वाचनकौशल्य प्रशिक्षणात सहभागी झालो तेव्हा आ. उषाताईंनी घेतलेल्या चाचण्या आठवल्या. प्रबोधिनी काय आहे हे मला खरेतर ४०व्या वर्षी नव्याने किंवा पूर्णपणे समजले! त्या वेळेस थरमॅक्समध्ये असताना Efficiency, Time management, Leadership, creativity, different facets of intelligence अशा विषयांची चर्चा सुरू असायची तेव्हा तेथील प्रशिक्षकांना मी सांगितले की हे सर्व विषय आम्ही शाळेतच शिकलो आहोत.


**थरमॅक्सची आगा फॅमिली ही व्यावसायिक असली तरी कंपनीतल्या सर्व सदस्यांची काळजी घेणारी आहे. ते नेहमीच जबाबदाऱ्या घ्यायला उत्सुक असणाऱ्यांना आणि नवीन काही करू पहाणाऱ्यांना प्रोत्साहन देतात. I have tried to emolute these in my life . Industry व corruption हा विषय चर्चेत येतोच. थरमॅक्समध्ये मी २६ वर्षे काम केले. आर. डी. आगा, अनु आगा यांनी सर्वांना स्वच्छ व्यवहारासाठी पाठबळ दिले. Always prefer an honest person, ethical and moral behaviour over an intelligent person!**

**निवृत्तीनंतरची क्षितीजे**

मी वयाच्या ५८व्या वर्षी हे Corporate World सोडून २०१६ मध्ये नेवरे (गणपतीपुळ्याच्या अलिकडे) येथील आमच्या वडिलोपार्जित सामाईक जमिनीत हापूस, काजू , पोफळी, नारळ व इतर झाडांची लागवड करण्यास आलो. दरवर्षी थोडी-थोडी करत आता सर्वांची मिळून १६०० संख्या आहे. साधारण दरवर्षी मी काही निवडक झाडे नव्याने लावत असतो. मी हे सुरू केले त्यावेळी माझे काही मित्र माझ्याकडे रहायला येत असत. तेव्हा माझ्या डोक्यात कॉटेज बांधण्याची कल्पना आली.













**कैरी विश्रांती होमस्टे**

दोन वर्षांपूर्वी डोंगर उतारावर पाच छोटी कॉटेज बांधली व 'कैरी विश्रांती होमस्टे', उंबरवाडी, नेवरे या नावाने हे रिसॉर्ट चालू आहे. पर्यटकांना कोकणातील संस्कृती, कोकणातील भौगोलिक व ऐतिहासिक वैशिष्ट्ये, जसे की चुंबकीय विस्थापन (Magnetic Distortion), तीस हजार वर्षं प्राचीन कातळशिल्पे (Petroglyphs), अस्सल कोकणी जेवण/खाद्यपदार्थ यांचा अनुभव देतो. यात प्रशालेतील सुरेंद्र (८६ तुकडी) व सई ठाकुरदेसाई यांचा महत्त्वाचा हातभार आहे. मी त्यांचा कोकण मेवा (हापूस गोड पन्हे, कोकम सरबत, तळलेले गरे, भाजलेले काजू, आमसूल) marketing / विक्रीसाठी मदत करतो.

या सर्वातून आमच्या वाडीतील लोकांना वर्षाला रु. ४.५-५ लाखांचा रोजगार मिळतो जो इथे खूप आहे. शहरी माणसांसाठी पाच लाख ही रक्कम कमी असली तरी येथील वाडीवरील लोकांसाठी ते मोठे उत्पन्न आहे. मी इथे येण्यापूर्वी अशाप्रकारची उलाढाल फारशी नसायची.
अजून पर्यटन वाढल्यानंतर पुढील दोन-तीन वर्षांत तो रु. १० लाखांपर्यंत जाईल.

मी मोठ्या उद्योगात काम करत असतांना जवळजवळ सर्व जगप्रसिद्ध Management Consultants शी संबंध आला. खूप नवीन शिकलो, काय आपल्याला उपयोगी नाही ते पण शिकलो. याचा लघु व मध्यम व्यवसायांना उपयोग करून घेता येईल या प्रेरणेने Business Transformation अशी Management Consultancy करतो. प्रबोधीनीतील LE-SPG मध्येही मी आहे आणि त्याद्वारे Mentoring व Start-up या प्रकारचे काम करण्याची ईच्छा आहे.

ती. आप्पांची 'रूप पालटू देशाचे' ही Vision आणि ती पूर्ततेस नेण्यासाठीचे Mission प्रबोधिनी देशाला १०० कार्यकर्ते/ नेते देणार यापासून खूप दूर आहोत परन्तु ते केल्याशिवाय पर्याय नाही. हे करण्यासाठी आर्थिक स्वायत्तता हवी.

मला नक्की माहित नाही की प्रबोधिनीचा Corpus किती आहे / लक्ष्य कितीचे आहे, पण ते फार कमी आहे असा माझा अंदाज. माझ्या मते साल २०२५ ला रु.१०० कोटी असणे जरूरी आहे. Money is freedom. Money is Force Multiplier ! But of course it's not everything !

मी नेहमीच प्रबोधिनीच्या सर्व विद्यार्थ्यांच्या यशस्वी वाटचाली बघत असतो आणि आत्ताच्या या ५१-५१ च्या गोष्टी वाचताना खूप जणांची वाटचाल वाचताना खूप आश्चर्य वाटते आणि वाचून आनंदही होतो. आणि मग असे वाटते की सगळे जरा लवकर सुरू झाले असते म्हणजे साधारण दहा वर्षांपूर्वी तर नेटवर्किंग अजून चांगले झाले असते.

कलेच्या बाबतीत सर्वात अवघड प्रश्न म्हणजे कोणते पुस्तक/ सिनेमा /गाणे असे टोकेदार प्रश्न. आपण जितका जास्त कलास्वाद घेऊ तितकी आवडीची संख्या वाढत जाणार आणि ते एक दोनात बंदिस्त करणे अवघडच नाही अन्यायकारक होईल.



## RAPID FIRE

१. आवडता चित्रपट- Gone with wind , कुंकू, साहेब बिबी और गुलाम, नाटक - तीन पैशाचा तमाशा

२. पुस्तके- जी ए, नेमाडे, गंगाधर गाडगीळ.

३. उद्योजक- आगा कुटुंबिय Thermax Ltd.

४. छंद/कला - वाचन एके वाचन


**अभय खेर**
**9422319711**
**abhaykher.pune@gmail.com**



**मुलाखत व शब्दांकन – श्रेयश फापाळे, अथर्व पाटणे संपादन – मानसी बोडस, पल्लवी गोखले – नगरकर**

**आरेखन व मांडणी – निशिगंधा खळदकर**

Write to us : jpp51_51@jnanaprabodhini.org